मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# हिंजवडीसह सात गावे पिंपरी-चिंचवड महापालिकेत घ्या

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दी लगत असलेली आयटी पार्क हिंजवडी, माण, मारूंजी, जांबे, नेरे, सांगवडे, गहुंजे ही सात गावे महापालिकेत घ्यावीत. त्यामुळे या गावांचा नियोजनबद्ध विकास होईल, असे साकडे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घातले आहे. त्यावर समावेशाची तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना दिले.

---

# तीन वर्षानंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नाही

## मोशीकरांना वापरावा लागतोय जुनाच पिनकोड; नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील तीन वर्षापूर्वी मोशीकरांसाठी नवीन पोस्ट कार्यालय आणि नवीन पिनकोड सुरु करण्यात आला. मात्र तीन वर्षानंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नसल्याने विद्यार्थ्यांना, इतर लोकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

नवीन पोस्टऑफीस, पिनकोड दिला मात्र कार्यान्वित नसल्याने जुनाच पिनकोड आळंदी पोस्ट ऑफिस चा वापरावा लागतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ॲडमिशन घेताना, पॉलिसीच्या ठिकाणी नवीन पिनकोड अस्तित्वात नसल्याचे सांगितले जाते. नाईलाजाने जुना पिनकोड वापरावा लागतो.
**- संतोष बोराटे, सामाजिक कार्यकर्ते.**

नागरिकांना जुनाच पिनकोड वापरावा लागत आहे. त्यामुळे तीन वर्षापासून सुरु केलेल्या पिनकोडचा काहीच उपयोग होत नाहीए. नागरिकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे हा पिनकोड कार्यान्वित करावा.
**- रूपाली आल्हाट, सामाजिक कार्यकर्त्या.**

पिनकोड कार्यान्वित करण्यासाठी केंद्र सरकारच्या हातात असते. पोस्टऑफीस मध्ये आम्ही फक्त शासनाकडून आलेल्या सुविधा देण्याचे काम करतो. नवीन पिन अजूनही कार्यान्वित नसल्याने तक्रारी येत आहेत.
**- सारिका नलावडे, पोस्ट ऑफीस एसपीएम.**

# जुन्या पुलांसाठी तज्ज्ञ नियुक्तीचा मार्ग मोकळा

## एकूण 1 हजार 34 पुलांचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट : महापालिकेच्या स्थायी समितीची मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील पूल पडल्याच्या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली होती. या घटनेत अनेकांना जीव गमवावा लागला होता. असे असतानाच शहरातील जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची प्रक्रिया तज्ज्ञ सल्लागार नियुक्तीअभावी रखडली होती. मात्र, शुक्रवारी झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत तज्ज्ञ सल्लागार नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता शहरातील एकूण १ हजार ३४ मोठ्या पुलांसह छोट्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे, अशी माहिती प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी दिली.

### दर तीन महिन्यांनी होणार ऑडिट

» पुणे शहरातील पूल, उड्डाणपूल, रेल्वे ब्रिज, फुटओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग, कल्व्हर्ट आदींच्या स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेणयात आला आहे. यामध्ये मोठे पूल एकूण ९८, नाले, ओढे आणि जास्त वाहतुकीचे असलेले एकूण २३६, तर लहान पण कमी वापरात असलेले असे एकूण सुमारे ७०० पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. हे ऑडिट दर तीन महिन्यांना केले जाणार आहे. तपासणी अहवालानुसार पुलांच्या कामाला प्राधान्यक्रम ठरविला जाईल. स्ट्रक्टॉनिक कन्सल्टिंग इंजिनिअर्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

---

# पुणे रेल्वे स्थानकावर रोजचे पावणेदोन लाख प्रवासी

## गर्दीमुळे पायाभूत सुविधांवर ताण, हडपसर, खडकीतून गाड्या सोडण्याचे

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची गर्दी गेल्या तीन वर्षांत लक्षणीय वाढली आहे. त्यामुळे स्थानकाच्या पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर हडपसर आणि खडकी या नवीन स्थानकांच्या पुनर्बांधणीला गती दिली असून, येत्या वर्षभरात लांब पल्ल्याच्या गाड्या या स्थानकांवरून सोडण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून नियोजन सुरू आहे.

### खडकी, हडपसरमधून लांब पल्ल्याच्या गाड्या

» हडपसर स्थानक सोलापूर, हैदराबाद आणि दक्षिण भारताकडे जाणाऱ्या गाड्यांसाठी उपयुक्त ठरेल, तर खडकी स्थानकावरून मुंबई, उत्तर भारत आणि गुजरातकडे धावणाऱ्या गाड्या सोडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# वाहतूक बेशिस्त, जनता त्रस्त चाकण परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीचा सुळसुळाट

## भरधाव वेगाने शेकडो तीन चाकी ऑटो रिक्षा, वाहनांद्वारे अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे

**पुणे | प्रतिनिधी**

अवैधरीत्या चालणाऱ्या प्रवासी वाहतुकीला या भागात उधाण आले असून भरधाव वेगाने शेकडो तीन चाकी ऑटो रिक्षा, वाहनांद्वारे अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे. एसटी बसस्थानकाच्या परिसरात, पुणे-नाशिक महामार्गावर, शिक्रापूर-तळेगाव रस्त्यावर आणि रस्त्यालगतच्या सर्व्हिस रस्त्यांवर (सेवा रस्ते) लागूनच अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने उभी करण्यात येत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. सातत्याने जाणवणाऱ्या वाहतूक कोंडीला अवैध वाहतूक काही अंशी जबाबदार आहे, अशी चर्चा नागरिक करीत आहेत.

याबाबत काही वाहतूक अभ्यासकांनी निरीक्षणे नोंदविली असून विशेषतः औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमधील कामगारांना ने-आण करण्यासाठी असणाऱ्या खासगी बसेस भरधाव व बेदरकारपणाने चालविल्या जातात आंबेठाण आणि तळेगाव चौक या ठिकाणी यांना सिग्नलचे कुठलेही बंधन नसल्याचे दिसून येते. सुसाट वेगात सिग्नल तोडून वेळ प्रसंगी वाहतूककोंडी करून सुद्धा या वाहनांचे चालक अरेरावी करत आपले वाहन दामटत असतात. त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहेत.

आंबेठाण चौक व तळेगाव चौकातील सिग्रल जवळ पीएमपीएमएलच्या बस, एसटी ज्या ठिकाणाहून सुटते तेथेच तीन, चाकी रिक्षावाल्यांनी बेकायदा शिरकाव केला असून सर्वच चौकांमध्ये अवैध प्रवासी वाहतूक वाले पीएमपीएमएल, एसटीच्या पुढेच आपल्या रिक्षा लावत आहेत. रिक्षावाले व अवैध वाहतूक करणारी मंडळी स्टॅन्डच्या तोंडावरच उभे राहून बेकायदा व्यवसाय करीत आहेत. यातील बहुतेक वाहने पुणे जिल्हा बाहेरची परवाना असणारी असून काही वाहनांवर तर नंबरची पाटीच गायब आहे. त्या ऐवजी दादा, भाई तसेच आमदार मित्र मंडळ अशी नाव टाकून वाहनचालक आपली ओळख लपवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

एसटी बसस्थानकाच्या परिसरात, पुणे-नाशिक महामार्गावर, शिक्रापूर-तळेगाव रस्त्यावर आणि रस्त्यालगतच्या सर्व्हिस रस्त्यांवर (सेवा रस्ते) लागूनच अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने उभी करण्यात येत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. सातत्याने जाणवणाऱ्या वाहतूक कोंडीला अवैध वाहतूक काही अंशी जबाबदार आहे, अशी चर्चा नागरिक करीत आहेत.



### पादचाऱ्यांनाही या अडथळ्यांचा मनस्ताप

» दुस-या जिल्ह्यातील वाहतूक परवाना (पासिंग) ,असलेले वाहन, विना नंबर, विना परवाना, रस्त्यावर वाहतुकीस अडथळा होईल अशा पद्धतीने अवैध वाहतूक करणारी वाहने उभी केली जातात त्यामुळे हमरस्त्यावरून ये -जा करणारी वाहने तसेच पादचाऱ्यांनाही या अडथळ्यांचा मनस्ताप होतो .

### कर्ज काढून...

» खेड तालुक्यात अनेक तरुणांनी कर्ज काढून स्वत:ची तीन व चारचाकी वाहने घेऊन प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय सुरू केला आहे. डोक्यावरील बँकेचे कर्ज मिटविण्यासाठी व संसाराचा गाडा चालविण्यासाठी अवैध असला तरीही हा व्यवसाय करण्याशिवाय त्यांच्याकडे कोणताही पर्याय नाही. दरम्यान, अधिकारी मंत्री येणार असल्यास पोलीसच अवैध वाहतूक त्यांच्या नजरेस पडू नये यासाठी दक्षता घेतात. मुळात अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालताना पीएमपीएल, एसटीचा कारभार सुधारावा अशी रास्त मागणी प्रवाशांची आहे.

### स्वयं शिस्तीचे...

»अवैध वाहतूक करणा-या वाहनचालकांना स्वयं शिस्तीने वाहन चालवता यावे असे प्रशिक्षण द्यावे अथवा त्यांचे समुपदेशन वर्ग घ्यावेत असा उपरोधिक सल्ला नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर नियमित प्रवास करणा-या वाहनचालकाने दिला आहे.

# कृत्रिम वाळू धोरणासाठी कार्यपद्धती निश्चित

## नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी आणि नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून 'एम-सँड'च्या विकासाला प्रोत्साहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

नद्यांमधून होणारे वाळूचे उत्खनन थांबविण्यासाठी राज्य सरकारने कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण तयार केले असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे. या धोरणामध्ये सरकारकडून काही सवलतीही देण्यात आल्या आहेत.

नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी आणि नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून 'एम-सँड'च्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी हे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यांची अंमलबजावणी कशी करावी, याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

त्यानुसार, जिल्हा प्रशासनामार्फत सार्वजनिक तसेच खासगी जमिनींवर 'एम-सँड' प्रकल्प सुरू करण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवर लिलावाची माहिती देण्यात येणार आहे. पाच एकरांपर्यंतच्या क्षेत्रासाठी लिलाव प्रक्रिया राबविली जाणार आहे.

एम-सँड' प्रकल्प उभारण्यासाठी नोंदणीकृत हमीपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तर अवैध उत्खननात किंवा वाहतुकीत दोषी आढळलेल्या व्यक्ती किंवा संस्थांना लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच प्रकल्प उभारताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचे 'कन्सेंट टू एस्टॅब्लिश' प्रमाणपत्र,

नियोजन प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र, उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र आणि महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम 2013 नुसार आवश्यक परवानग्या सादर करणे अशा अटी घालण्यात आल्या आहेत.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या खाणपट्ट्यांच्या धारकांनाही शंभर टक्के 'एम-सँड' उत्पादन करण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवर अर्ज करता येईल आणि सरकारच्या मान्यतेनंतर जुना खाणपट्टा रद्द करून नवीन 'एम-सँड' खाणपट्टा देण्यात येणार आहे. प्रमुख खनिजांच्या खाणीतील साहित्य आणि इमारतींच्या कामातून निघालेल्या दगडापासून एम-सँड निर्मितीलाही परवानगी दिली जाईल, ज्यासाठी संबंधित वाहतूक परवानग्या व स्वामित्वधन आकारणी करण्यात येणार आहे..



### लिलाव प्रक्रिया राबविली जाणार

» नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून 'एम-सँड'च्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी हे धोरण ठरविण्यात आले म-सँड' प्रकल्प सुरू करण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवर लिलावाची माहिती देण्यात येणार आहे. पाच एकरांपर्यंतच्या क्षेत्रासाठी लिलाव प्रक्रिया राबविली जाणार आहे.

" अवैध उत्खननात किंवा वाहतुकीत दोषी आढळलेल्या व्यक्ती किंवा संस्थांना लिलावात भाग घेता येणार नाही. भविष्यात नद्यांमधून वाळूचे उत्खनन पूर्णपणे थांबविण्याचा प्रयत्न आहे. त्याबरोबरच बांधकामांसाठीही वाळू उपलब्ध होणे आणि वाळूची चोरटी वाहतूक थांबविणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

# वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी संस्थेला त्रिभुवन सहकार विद्यापीठाची मान्यता

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती, वैकुंठभाई मेहता संस्था 6 अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वैकुठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था (VAMNICOM) ही त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची (TSU) मान्यता मिळवणारी देशातील पहिली संस्था झाली आहे. या संस्थेत सध्या चार दीर्घकालीन पदवी आणि सहा अल्पकालीन कौशल्यवर्धित अभ्यासक्रम चालवले जातात. हे अभ्यासक्रम आता संस्थेच्या वतीने त्रिभुवन विद्यापीठाअंतर्गत चालवले जातील. पारंपारिक अभ्यासक्रमासोबतच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहकारातील वापरासंबंधीचे अभ्यासक्रम आता या संस्थेत शिकवले जातील. यामुळे युवकांसाठी विशेषत: ग्रामीण भागातील युवकांसाठी करीयरचे नवे दालन खुले होत आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

वैकुंठभाई मेहता संस्थेच्या वतीनं सध्या कृषी व्यवसाय व्यवस्थापनाचा २ वर्षांचा पदव्युत्तर -पदविका, सहकार विषयातील २ वर्षांचा पदव्युत्तर - पदविका, सहकारी बँकिंग आणि वित्त विषयातील ४ वर्षांचा व्यवसाय प्रशासन डिग्री आणि सहकारी व्यवसाय व्यवस्थापनाचा ९ महिन्यांचा डिप्लोमा हे अभ्यासक्रम चालवले जातात. सहकाराच्या विषयांमध्ये विद्यार्थ्यांचा सैद्धांतिक पाया भक्कम करणे आणि त्यांना व्यावहारिक अनुभव प्रदान करणे हे या अभ्यासक्रमांचे उद्दिष्ट आहे.

सहकारी क्षेत्रातील विशिष्ट कौशल्य कमतरता आणि नेतृत्वाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वैकुंठभाई मेहता संस्था ६ अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवत आहे. यामध्ये कृषी-विपणन आणि सहकारी संस्थांमध्ये मूल्यवर्धन करणे, कृषी उत्पादक संघटनांचे व्यवस्थापन आणि तंत्रज्ञांसाठी दुग्ध तंत्रज्ञान या विषयातील २ महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश आहे. कृषी उत्पादन आणि भावांचा अंदाज (AGRICULTURAL COMMODITIES AND PRICE FORECASTING), युवा नेतृत्व आणि सामाजिक बदल (YOUTH LEADERSHIP AND SOCIAL CHANGE), आणि सहकारासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र (MICRO-ECONOMICS FOR COOPERATIVES) या विषयांचा १ महिन्याचा अभ्यासक्रम आहे.



### सहकारातून समृद्धीकडे नेण्यासाठी महत्वपूर्ण

» भविष्यातील गरजेनुसार वैकुंठभाई मेहता संस्थेने डिजिटल सहकारी संस्था, सहकारी आर्थिक तंत्रज्ञान आणि शाश्वत ग्रामीण उद्योजकता यासारख्या नव्या जमान्याच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. या विषयातील डिप्लोमा, डिग्री आणि कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. आगामी काळात सहकार क्षेत्रात काम करणाऱ्यांना वेगाने विकसित होणाऱ्या सामाजिक-आर्थिक परिदृश्यात आवश्यक असलेले ज्ञान देत त्यांना काळासोबत सुसज्ज करणे हा या अभ्यासक्रमांचा उद्देश आहे. त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची अधिकृत मान्यता ही वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेसाठी एक परिवर्तनाचा क्षण आहे. सहकारी क्षेत्रातील अभ्यासक्रमांसाठी एक मजबूत राष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठ तयार होईल. .

> ‘पुणे लोकसभा मतदारसंघात गेली अनेक वर्षे सहकार क्षेत्रासाठी कार्यरत असलेली वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था आहे. त्रिभुवन सहकार विद्यापीठाची या संस्थेला देशातील पहिली मान्यता मिळाल्याने आता या सहकार विषयक पूर्ण शैक्षणिक काम व्हॅमनिकॉमला करता येईल. तसेच येथे शिकणाऱ्या सर्वांना अधिकृत विद्यापीठाची पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र मिळेल. तसेच या संस्थेत आता सहकार विषयक संशोधनालाही चालना मिळेल. ग्रामीण भागातील युवकांसाठी करिअरचे नवे दालन खुले होईल. त्यामुळे देशातील सहकारापासून समृद्धीकडे नेण्यासाठी हे टाकलेले महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे’.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय मंत्री**

# गणरायाला यंदा महागाईची झळ मूर्तींच्या किमतीत 15 ते 20 टक्के वाढ

## यंदा सुमारे 15 ते 20 हजार गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या असून, सध्या रंगकाम आणि अंतिम सजावटीचे काम वेगाने सुरू आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाच, खेड तालुक्यातील औद्योगिक पट्ट्यातील कुरुळी येथील मूर्तिकारांवर यंदा महागाईची झळ बसली आहे. मूर्ती बनवण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या साहित्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने, यंदा गणेश मूर्तींच्या किमतीत 15 ते 20 टक्क्यांची वाढ झाल्याचे कारागिरांनी सांगितले.कुरुळीतील कुंभार वाड्यात गेल्या 40 वर्षांपासून मूर्ती घडवण्याची परंपरा सुरु आहे. यंदा सुमारे 15 ते 20 हजार गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या असून, सध्या रंगकाम आणि अंतिम सजावटीचे काम वेगाने सुरू आहे.

अनेक भागातून या मूर्तींसाठी आगाऊ मागणी केली जाते. यंदा शाडू माती, नैसर्गिक रंग, सजावटीचे साहित्य, वाहतूक खर्च आदी सगळ्याच बाबींमध्ये लक्षणीय दरवाढ झाली आहे. त्यामुळे मूर्तिकारांचे गणित कोलमडले असून, किमती वाढवणे अपरिहार्य ठरले आहे. आम्ही शक्य तेवढ्या कमी नफ्यात काम करत आहोत.कुरुळी परिसरातील कुंभार समाजाच्या या परंपरेमुळे गणेशभक्तांना दर्जेदार मूर्ती मिळतातच, पण स्थानिक बेरोजगार युवकांनाही या काळात रोजगाराचा आधार मिळतो. कुरुळी येथील मूर्तिकार हे फक्त कलेचे नव्हे, तर श्रद्धेचेही संवाहक आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही मूर्तींसाठी अनेक ग्राहकांचे आगाऊ बुकिंग झाले आहे.



### आमचे काम नाही, आराधना आहे

» कुरुळी येथील मूर्तिकार हे फक्त कलेचे नव्हे, तर श्रद्धेचेही संवाहक आहेत. मूर्तीसाठी अनेक ग्राहकांचे आगाऊ बुकिंग झाले आहे. ग्राहक नाराज होऊ नयेत, पण वाढलेल्या खर्चामुळे आम्हालाही मर्यादा आहेत, अशी भावना येथील मूर्तिकारांनी व्यक्त केली. कलेबरोबर श्रद्धेचा समतोल राखत आम्ही मूर्ती घडवतो. हे आमचं काम नाही, आमचं आराधन आहे, असे मूर्तिकाराने सांगितले..

काही मूर्ती तर पूर्णतः पर्यावरणपूरक आहेत-शाडू मातीपासून बनवलेल्या, ज्या घरच्या घरी विसर्जित करता येतात. स्थानिक महिला, युवक, तसेच शालेय सुट्टीतील विद्यार्थीही मूर्ती रंगविण्याच्या कामात हातभार लावत आहेत. यामुळे कुटुंबांना आर्थिक आधार मिळतो, शिवाय एक सामाजिक सलोखा आणि सहकार्याची भावना निर्माण होते. गणेशभक्तांनी स्थानिक कलाकारांकडून मूर्ती खरेदी करून त्यांचे प्रोत्साहन करावे, असा संदेश येथील मूर्तिकारांनी दिला आहे. गणपती बाप्पा येताना आमच्यासाठी आनंदही आणतो आणि जगायला उमेदही, असं भावना मूर्तिकारांनी व्यक्त केली.